**दोन मजली घर भाडयाने देणे आहे**

शिवगंगानगर भाग २, गोविंदश्री मंगलकार्यालयाजवळ, (Block No - 124 ). तळमजल्यावर - 1 BHK, पहिला मजला- एक रूम, टॉयलेट, बाथरूम, गच्ची. वैशिष्टे - नवीन colour केलेले, Compound, security Gate etc. KLE/ IMS शाळा, डि मार्ट जवळ.

**संपर्क- दयानंद माशाळकर. 9423331752.**
**सदानंद माशाळकर 9924148970**

भाडे- 12000 डिपॉझिट- 25,000.
एजंट, ब्रोकर यांनी संपर्क करु नये.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**सेवेकरी भरती**

१) सुपरवायझर- १ । २) पुजारी- १
३) शेतगडी जोडी- २ । ४) सफाई सेवेकरी- १
५) वॉचमन- ३ । ६) स्वयंपाक बाई-१

याप्रमाणे सेवेकरी भरती चालू आहे
होतकरू गरजू यांनी संपर्क साधावा

पत्ता:- श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर रोड १२१ कान्होळी अक्कलकोट
संपर्क:- 8625050111



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १६२ वा | बुधवार, दि. २९ जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



**हुरडा पार्टी**

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११



**वाडा भाड्याने देणे आहे**

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्क: 9975434591


# खरं सांगा एकनाथराव बच्चू कडूंचा गेम कुणी केला ?

दत्तकुमार खंडागळे
मो. 9561551006

राज्याचे माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचा विधानसभेत पराभव झाला आणि सभागृहातला शेतक-यांचा बुलंद आवाज लुप्त झाला. आता इथून पुढची पाच वर्षे जनतेलाच नव्हे तर सभागृहालाही त्यांची पोकळी जाणवत राहिल. सभागृहाच्या भिंतीही त्या कणखर व बाणेदार आवाजाची आठवण काढत राहतील. विधानसभेत गेली वीस वर्षे शेतक-यांचा, अंध-अपंगांचा व जन-सामान्यांचा बुलंद आवाज म्हणून त्यांची तोफ धडाडत होती. सरकारवर ते तुटून पडत होते, लोकांचे प्रश्न पोटतिडकीने मांडत होते. आजवरचे प्रत्येक अधिवेशन त्यांनी गाजवले. पण या वेळी विधानभेत त्यांच्या बुलंद आवाजाची उणीव भासताना



दिसते आहे. विधानसभेत बच्चू कडू उभे राहिले की वाघाने डरकाळी फोडल्यासारखे तुटून पडायचे. सरकार कुणाचेही असो बच्चू कडू कडाडले की सरकारला घाम फुटत होता. मस्तवाल अधिका-यांना व प्रशासनाला धडकी भरत होती. शेतक-यांचे, अपंगांचे, वंचीतांचे प्रश्न अतिशय ताकदीने आणि प्रभावीपणे ते मांडत होते. आता अजून पाच वर्षे विधानसभेत हा आवाज घुमणार नाही. पुढच्या वेळी ते विधानसभेत पुन्हा निवडूण येतील. पुन्हा सभागृह गाजवतील. जन-सामान्यांसाठी त्यांच्याइतके त्वेषाने आता कोण कडाडणार नाही. सत्ताधा-यांच्यावर तुटून पडणार नाही, सत्तेला कुणी जाब विचारणार नाही याची खंत वाटते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकीत त्यांचा ठरवून गेम केला गेला. त्यांना जाणिवपुर्वक पाडण्यात आले. त्यांचा गेम का केला ? कुणी केला ? हे स्पष्ट आहे. आजवर जनताच माझी नेता आहे असं म्हणणा-या बच्चू कडूंनी एकनाथ शिंदेना नेता मानले होते आणि फडणवीसांच्या शब्दांचे मोल सांभाळत एका कॉलवर गुवाहटीला जाऊन तथाकथित उठावात त्यांनी सहभाग घेतला होता. पण या बदल्यात या दोघांनी त्यांना काय दिले ? हा खरा प्रश्न आहे. या दोघांची हातापायासकट सगळीच्या सगळी बोटं सत्तेच्या तुपात बुडाली आणि बच्चू कडू फक्त बदनाम झाले. त्याना काय मिळाले तर अवहेलना आणि बदनामी.

एकनाथ शिंदेंच्या गुवाहटी कांडात सहभागी असणा-या प्रत्येकाचा फायदा झाला. सदरचे बंड प्रत्येकाच्या पथ्यावर पडले. अपवाद फक्त एकट्या बच्चू कडूंचा. या बंडाने त्यांना काय दिले ? हा चिंतनाचा विषय आहे. भानगडीत गुंतलेला एखादा 'धन्या' प्रेम प्रकरणात पोरगी पळवतो, त्याचा मित्र 'गण्या' त्याला पावलोपावली चिठ्या पुरवण्यासह साथ देतो. मन्या नावाचा तिसरा मित्र यात जास्त सहभागी नसतो. तो ऐनवेळी लग्नाला हजर होतो पण चिडलेले लोक 'मन्या' लाच बेदम ठोकून काढतात. बिचा-या 'मन्या' चा फारसा हात नसतो पण, "चला आहे मित्र करू आपणही मदत !" म्हणत ऐनवेळी सहभाग घेणा-या ' 'मन्या' वर सगळ्यांचा रोष निघतो. चिडलेले लोक त्याला फोडून काढतात. बेदम चोपतात, त्याचे घर पाडतात. तिकडे 'धन्या' पोरीला पळवून नेत गमजा करतो, संसार थाटतो, पोरंबाळं जन्माला घालतो, त्याचा साथिदार 'गण्या' ही नामानिराळा राहतो. 'धन्या' त्याला मदत करतो. पण या सगळ्या प्रकरणात बिच्चारा 'मन्या' फुकट मरतो. 'धन्या' त्याला मदत केली म्हणून काही देतही नाही. लग्नातली बुंदीपण गड्याच्या वाट्याला येत नाही. गुवाहटी कांडात बच्चू कडूंची अवस्था अगदी या 'मन्या' सारखीच झाली आहे. बाकीचे सगळे नामानिराळे राहिले. त्यांना सत्ता मिळाली, सत्तेची रसद मिळाली, मंत्रीपदं मिळाली पण सर्वात जास्त बदनामी वाट्याला आली ती फक्त बच्चू कडूंच्याच. तीस-चाळीस वर्षाच्या राजकारणात त्यांनी जे जपले ते धुळीला मिळाले. एकनाथ शिंदे 'नायक' झाले, फडणवीसांच्या हातात सत्ता आली, अनेकांना मंत्रीपदं मिळाली आणि बच्चू कडू 'खलनायक' ठरले. देवेंद्र फडणवीसांच्या एका फोनवर गुवाहटीला जाणा-या बच्चू कडूंच्या पदरात काय पडले ? हा संशोधनाधनाचा विषय आहे. बच्चू कडूंना लोकांचा विश्वास गमवावा लागला. स्वतःची प्रतिमा धुळीस मिळवावी लागली. त्यांना या बदल्यात मिळाले काय तर दिव्यांग मंत्रालयाचा खुळखुळा. सदरचे मंत्रालय देण्याचे आश्वासन देत त्यांचे राजकारणच अपंग (दिव्यांग) करून टाकले गेले. ना त्यांना कॅबिनेट मंत्रीपद दिले, ना त्यांना धडपणे 'दिव्यांग मंत्रालय' दिले. दिव्यांग मंत्रालयाला ना निधी, ना दालन, ना व्यवस्था. काहिच न देता फक्त दर्जा देऊन झुलवत ठेवले. 'लग्न' करून 'बायको' करणार नाही पण 'बायकोचा' दर्जा देतो, बायको सारखं ठेवतो अशी फसवणूक करणारा लबाड प्रियकर जसा 'प्रियसी' ला (पान 2 वर..)

# सर्व खाजगी रुग्णालयांनी जीबीएस रुग्णांची माहिती तात्काळ आरोग्य यंत्रणेला दिली पाहिजे-जिल्हाधिकारी आशीर्वाद

## जीबीएस(गुईलेन बॅरे सिंड्रोम) आजार संसर्गजन्य नसल्याने नागरिकांनी घाबरू नये, काळजी घ्यावी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्याच्या ग्रामीण, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील सर्व खाजगी रुग्णालयांकडे गुईलेन बॅरे सिंड्रोम (GBS) आजाराचा रुग्ण आढळल्यास त्याबाबतची माहिती तात्काळ संबंधित शासकीय आरोग्य यंत्रणेने घेऊन त्याचा दैनंदिन अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जीबीएस आजाराच्या अनुषंगाने आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. संजीव ठाकूर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार यांच्यासह अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की जिल्ह्याच्या ग्रामीण भागासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या आरोग्य यंत्रणेला खाजगी रुग्णालयातील जीबीएस आजाराच्या रुग्णांची दैनंदिन माहिती घेण्याबाबत करण्याचे निर्देश दिले तसेच नगरपालिका क्षेत्रातील रुग्णांच्या माहितीसाठी जिल्हा शिल्लक चिकित्सक त्यांच्या अंतर्गत च्या वैद्यकीय अधीक्षक यांनी नगरपालिका क्षेत्रातील खाजगी रुग्णालयांच्या बैठका घेऊन त्यांना या आजाराबाबत मार्गदर्शन करावे तसेच त्यांच्याकडून दैनंदिन रिपोर्ट घ्यावा तर सोलापूर शहरातील जीबीएस आजारांच्या रुग्णाबाबत महानगरपालिकेच्या आरोग्य यंत्रणेने शहरातील सर्व खाजगी रुग्णालयांच्या स्वतंत्र बैठक आयोजित करून त्यांना या आजाराच्या अनुषंगाने माहिती देऊन त्यांच्याकडून दैनंदिन अहवाल मागून घ्यावा उपरोक्त सर्व शासकीय यंत्रणांनी दैनंदिन अहवाल प्राप्त करून तो अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करावा.



जे खाजगी रुग्णालय जीबीएस आजाराच्या रुग्णांची माहिती देणार नाहीत अशा रुग्णालयावर विहित नियमावलीनुसार कारवाई करावी, असे त्यांनी सुचित केले.

ग्रामीण भागातील मोठ्या गावामध्ये जिल्हा परिषदेने पाणी नमुन्याची तपासणी करावी तसेच जीबीएस आजाराच्या लक्षणांच्या अनुषंगाने सर्वेक्षण करावे. हीच मोहीम नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात संबंधित यंत्रणांनी राबवावी. तसेच या आजाराच्या अनुषंगाने सर्वसामान्य नागरिकांना माहिती हवी यासाठी ग्रामीण नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात होर्डिंग बॅनर जिंगल याद्वारे उपायोजना प्रतिबंधात्मक कारवाई तसेच नागरिकांनी घ्यावयाची काळजी या अनुषंगाने जनजागृती मोहीम राबवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. तसेच नागरिकांनी घाबरून जाऊ नये, हा आजार संसर्गजन्य नाही यामध्ये योग्य काळजी व दक्षता घ्यावी. दूषित पाणी पिऊ नये व कच्चे मास खाऊ नये असे आवाहन त्यांनी केले.

अन्न औषध प्रशासनाने जिल्ह्यातील हॉटेलमधील पाणी व अन्नाचे नमुने घ्यावेत. जे हॉटेल चालक स्वच्छता ठेवणार नाहीत अशा हॉटेल चालकाना नोटीस द्याव्यात.

पाणीपुरी व अन्य तत्सम फूटपाथ वरील पदार्थांचेही नमुने घेऊन त्याची तपासणी करावी.

कुठेही अस्वच्छता व दूषित पाणी आढळल्यास त्यांना नोटीस देऊन पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. आयुष्यमान भारत योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नोंदणीकृत झालेल्या खाजगी रुग्णालयांनी जीबीएस आजाराच्या रुग्णावर योजनेअंतर्गत मोफत उपचार करावे. जे रुग्णालये असे करणार नाहीत त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

या आजाराच्या उपचारासाठी प्रतिबंधात्मक औषधे तसेच इंडक्शन स्टडी साठी आवश्यक मशिनरी घेण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून माननीय पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेनुसार तात्काळ दोन कोटीचा निधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला देण्यात येणार आहे. तसेच यासाठी अतिरिक्त निधी आवश्यक असेल तोही उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

जीबीएस आजाराचे पाच रुग्ण सोलापूर जिल्ह्यात आढळलेले असून त्यातील एका रुग्णाचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती असून उर्वरित चार रुग्ण हे उपचार घेत असून हे चारही रुग्ण सोलापूर जिल्ह्याबाहेरील असल्याची माहिती आरोग्य यंत्रणा कडून यावेळी देण्यात आली.

तसेच या आजाराच्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या वतीने जनजागृती करण्यात येत असून शासकीय रुग्णालयामध्ये आवश्यक राखीव बेडची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

# जिल्हा नियोजन समित्यांवरील नामनिर्देशित अन विशेष निमंत्रित सदस्यांच्या नियुक्त्या रद्द

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) संदर्भात राज्य सरकारने आज (ता. 28 जानेवारी) मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व जिल्हा नियोजन समित्यांवर नामनिर्देशित सदस्य आणि विशेष निमंत्रित सदस्य म्हणून राज्य सरकारकडून करण्यात आलेल्या नियुक्त्या त्वरित प्रभावाने (तत्काळ) रद्द करण्यात आल्या आहेत.

त्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला आता केवळ आमदार आणि खासदारांनाच बसता येणार आहे, त्यामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांना आपल्या इच्छांना नव्याने निवड होईपर्यंत मुरड घालावी लागणार आहे.

जिल्हा नियोजन समिती (DPC) ही जिल्ह्याच्या विकास निधीची गंगा समजली जाते. नियोजन समितीच्या बैठकीत कोणाला किती निधी द्यायचा, हे ठरते. संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीची बैठक होत असते. जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार हे नियोजन समितीचे सदस्य असतात, त्यामुळे ते बैठकीला उपस्थित राहू शकणार आहेत.

जिल्हा नियोजन समितीच्या संदर्भात राज्य सरकारचे उपसचिव नितीन खेडकर यांनी याबाबतचे परिपत्रक आज जाहीर केले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व नियोजन समित्यांवर नामनिर्देशित सदस्य आणि विशेष निमंत्रित सदस्य राज्य सरकारकडून करण्यात आलेल्या नियुक्त्या निर्णय झाल्याच्या क्षणापासून म्हणजे तत्काळ रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे मागील सरकारच्या काळात झालेल्या नियुक्त् झालेल्या सदस्यांच्या आनंदावर विरजण पडले आहे.

सरकार बदलल्यानंतर पालकमंत्र्यांच्या नियुक्त्याही नव्याने होतात. पालकमंत्र्यांच्या नियुक्तीनंतर जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांच्या निवडी होतात. सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांना या नियुक्त्यांमध्ये प्राधान्य मिळते, त्यामुळे जिल्हा नियोजन समितीवर नियुक्त्यांसाठी सत्ताधारी कार्यकर्त्यांमध्ये चढाओढ असते.

आतातही महायुती सरकारमध्ये नियोजन समितीवर जाण्यासाठी स्पर्धा लागली आहे.


**सोलापूर डीपीसीची 30 जानेवारीला बैठक**

सोलापूरच्या जिल्हा नियोजन समितीची (डीपीसी) बैठक येत्या गुरुवारी (ता. 30 जानेवारी) होणार आहे. त्या बैठकीला आपल्याला उपस्थित राहता येईल, या खुशीत मागील वेळी नियुक्त करण्यात आलेले सदस्य होते. मात्र, राज्य सरकारने आज तातडीने आदेश काढून जुन्या नियुक्त्या रद्द केल्या आहेत, त्यामुळे जुन्या सदस्यांना या डीपीसीच्या बैठकांना उपस्थित राहता येणार नाही. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नवनिर्वाचित आमदार आणि खासदारांच्या उपस्थितीत ही बैठक होणार आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** लोकसभा विधानसभा निवडणुकीनंतर राज्यातील जनतेचे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष लागले आहे. गेल्या ४ वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यामुळे निवडणूका लांबणीवर पडल्याचे चित्र आहे.

यातच आज पुन्हा २३ व्या नंबरवर सर्वोच्च न्यायालयात निवडणूका आणि ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. परंतु आज पुन्हा न्यायालयाकडून सुनावणीसाठी पुढची तारीख देण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर



पडणार असल्याची चिन्ह आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी पुढील सुनावणीसाठी २५ फेब्रुवारीची तारीख दिली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर प्रत्येक पक्षाला आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेध लागले आहेत. यासाठी राजकीय पक्षांकडून मोचेर्बांधणी देखील सुरु झाली आहे. पण राजकीय धुरीणांसह जनतेला निवडणुकीची पुढील काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. या याचिकेच्या माध्यमातून न्यायालयात निवडणुका घेण्यासंदर्भात विनंती करण्यात आली. ओबीसी आरक्षण असो किंवा नसो पण निवडणुका व्हाव्यात, अशी याचिकाकर्त्यांनी मागणी केली आहे.

दरम्यान मुख्यमंत्र्यांनी अलीकडेच पार पडलेल्या भाजपच्या राज्यस्तरीय अधिवेशनात लवकरच राज्यात निवडणूका लागणार असल्याचे संकेत दिले होते. तर निवडणुका लवकरात लवकर लागाव्यात यासाठीही आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले होते. पण आज झालेल्या सुनावणीत सरकारी पक्षाच्या पदरी पुन्हा निराशा पडली आहे. पुढील सुनावणी २५ फेब्रुवारीला होणार असून यावेळी काय निर्णय होणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

# ग्रंथपालन प्रशिक्षण प्रवेश अंतिम दिनांक 31 जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने सर्व समावेशक, शाळा, कॉलेज, आश्रम शाळा, सार्वजनिक ग्रंथालय, रेल्वे महामंडळ ,कोर्ट, कृषी विभाग, कृषी विद्यापीठ, खाजगी कंपन्या इत्यादी विभागात ग्रंथपाल , ग्रंथालय सहाय्यक, निर्गम सहाय्यक ,ग्रंथालय परिचर आणि विशेष करून आरोग्य विभागात अभिलेखापाल या पदाकरीता रोजगाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे नवीन सुधारित सहा महिन्याचे ग्रंथपालन प्रशिक्षणाची निर्मिती केली आहे. सदर प्रशिक्षण हे जानेवारी २०२५ ते जून २०२५ या कालावधीमध्ये होणार असून या प्रशिक्षणाच्या प्रवेशा करिता इयत्ता बारावी कोणत्याही शाखेतून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रवेशा करिता वयाची अट नाही. या प्रशिक्षणाचे माध्यम मराठी राहणार असून प्रशिक्षणाचे स्थळ : सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, सोलापूर, यांचे सोलापूर येथील जुना पुणा नाका कार्यालय राहणार असून प्रशिक्षणाचे वर्ग दर शनिवारी आणि रविवारी या दोनच दिवशी राहणार आहेत. प्रशिक्षणाची प्रवेश प्रक्रिया दररोज सकाळी १० ते दुपारी 5 या वेळात सुरू असून प्रवेशाचा अंतिम दिनांक 31 जानेवारी २०२५ पर्यंत असून प्रवेशा करिता कोणत्याही मूळ (ओरिजनल) शैक्षणिक प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. करिता जिल्ह्यातील सर्व ग्रंथप्रेमी नागरिक त्याचप्रमाणे शाळा, कॉलेजचे विद्यार्थी, कर्मचारी, स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी सुशिक्षित बेरोजगार युवक, युवती यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. हा अभ्यासक्रम डी.एड समकक्ष आहे. सदर प्रशिक्षणा करिता प्रवेश घेण्याची अंतिम तारीख 31 जानेवारी आहे. प्रवेशाकरिता इयत्ता बारावीची गुणपत्रिका झेरॉक्स, शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स, जातीच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स आणि आधार कार्डची झेरॉक्स त्याचप्रमाणे तीन पासपोर्ट फोटो इत्यादी आवश्यक राहणार आहेत . प्रशिक्षणाच्या प्रवेशा करिता अधिक माहितीसाठी 9404666488 / 7350922276 या भ्रमणध्वनीवर संपर्क करू शकता, असे आवाहन सोलापूर केंद्राचे वर्गव्यवस्थापक ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांनी केले आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडून विविध विभागांचा आढावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हास्तरीय समन्वय समिती, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समिती, 108 रुग्णवाहिकांच्या सेवाबाबत, एनटीसीपी समन्वयक समिती, जिल्हास्तरीय दक्षता समिती, कृष्ठरोग शोध मोहिम आणि स्पर्श अभियान सीएस तसेच जिल्हास्तरीय स्थायी लेखा परिक्षण समिती अशा विविध विभागांच्या कामकाजाचा बैठकीद्वारे आढावा घेऊन सर्व संबंधित विभागाने आरोग्य विभागाच्या विविध योजनांची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, डीपीओ भगवान भुसारी, सहायक संचालक आरोग्य सेवा (कृष्ठरोग) डॉ. मोहन शेगर, मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिनाक्षी बनसोडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. आनंद गोडसे, वैदकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्रीमती



वैशाली थोरात, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्रीमती वंदना शिंदे, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

समाजात असलेल्या प्रत्येक संशयित कुष्ठरुग्णांचा शोध पथकामार्फत शोध घेऊन त्याचे निदान निश्चित करणे व निदान झालेल्या कुष्ठरुग्णांना तात्काळ बहुविध औषधोपचार सुरु करण्यासाठी केंद्र शासनाने कुष्ठरोग अभियान सुरु केले आहे. हे अभियान 14 दिवसाचे असणार आहे. या अभियानात राज्यातील 20 जिल्ह्यामध्ये सोलापूर जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील या 14 दिवसाच्या अभियानासाठी 36 लाख 57 हजार 590 लोकसंख्येची निवड करण्यात आली असून 2768 शोधपथके तयार करण्यात आली आहेत. शोध पथकाने शोधलेल्या प्रत्येक संशयीताची तपासणी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून करण्यात येणार आहे. या अभियान दरम्यान तपासणी करण्याकरीता येणाऱ्या पथकाकडून तपासणी करुन घेऊन सहकार्य अरावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी केले आहे.

एचआयव्ही एड्स रुग्ण संख्या, उपचार पध्दत, टीबी तपासणी, औषधोपचार बाबत बैठकीत चर्चा झाली. एचआयव्ही पॉझिटीव्ह रुग्णांना सामाजिक सुरक्षा बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी मार्गदर्शन केले. (पान 2 वर..)

# हार्वेस्टर मालकांचे पैसे न दिल्यास वाल्मिकच्या दुसऱ्या बायकोची संपत्ती ताब्यात घेऊ; शेतकरी संघटनेचा इशारा

**सोलापूर :** बीडमधील खंडणी व सरपंच हत्याप्रकरणामुळे सध्या चर्चेत आणि अटकेत असलेला आरोपी वाल्मिक कराडविरुद्ध पोलीस कारवाईला वेग आला आहे. त्यातच, त्याच्या संपत्तीचे आणि पोलिसांशी असलेल्या संबंधाचे दररोज नवनवीन प्रकरणे बाहेर येत आहेत. काही दिवसांपूर्वी त्याच्या दुसऱ्या पत्नीची शेती बार्शी तालुक्यातील गावात असल्याचे उघडकीस आले होते. त्यानंतर, आज वाल्मिक कराडची आणखी एक ऑडिओ क्लिप



व्हायरल झाली असून पोलिसांवर दबाव टाकताना आपण इथं बाप बसलोय, असे तो म्हणत आहे. त्यामुळे, पुन्हा एकदा त्याच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यातच, ज्या शेतकऱ्यांकडून हार्वेस्टरसाठी वाल्मिक कराडने पैस उकळले त्या शेतकऱ्यांनी आता (पान 2 वर..)

## संपादकीय

# तपासाचा घोळ

महाराष्ट्राच्या गृहखात्याचा कारभार सांभाळणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी राजधानी मुंबईमध्ये मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले. देशातील ही पहिली मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन असून गुन्ह्याच्या ठिकाणी जाऊन तपासाला मदत करण्याचे काम ही अत्याधुनिक व्हॅन करणार आहे. कोणत्याही गुन्ह्याच्या तपासासाठी आणि गुन्हेगारापर्यंत पोहोचण्यासाठी न्यायवैद्यकशास्त्र म्हणजेच फॉरेन्सिक तंत्रज्ञानाची गरज असते. साहजिकच या मोबाइल व्हॅनच्या आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल महाराष्ट्र सरकारचे स्वागत करत असतानाच सैफ अली खान याच्यावरील हल्ला किंवा बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील खून प्रकरणाच्या तपासाबाबत जो घोळ सुरू आहे त्याचा विचारही या आधुनिक तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर करावा लागणार आहे.

सैफ अली खानचा खरा हल्लेखोर जरी सापडला असला, तरी त्याआधी पोलिसांनी तातडीने तपास करण्याचे निमित्त करून ज्या एका व्यक्तीला अटक केली होती त्या व्यक्तीला या अटकेच्या घोळामुळे आणि गैरसमजामुळे आता जे काही भोगावे लागत आहे त्याचा विचारही यानिमित्ताने करावा लागणार आहे. अनेक वेळा एखाद्या प्रकरणात लोकक्षोभ थांबवण्यासाठी किंवा आपण जलदगतीने तपास केला आहे हे भासवण्यासाठी पोलीस एखादा गुन्हेगार आणून उभा करतात, हे वास्तव सर्वांनाच माहीत आहे. नंतर खरा गुन्हेगार सापडल्यावर त्यालाही पुढे करण्याचे काम केले जाते. सैफ अली खानवरील हल्ल्याबाबत असेच करण्यात आले आहे. प्रारंभी हल्ला झाल्यानंतर सीसीटीव्हीचे जे फूटेज समोर आले त्या आधारे कनोजिया नावाच्या एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले होते.त्याच्या हाताचे ठसे आणि घटनास्थळाच्या हाताचे ठसे जुळले नसल्याने त्याचा या हल्ल्याशी काही संबंध नसल्याचे लक्षात आले होते. पण दरम्यान या कनोजिया नावाच्या तरुणाचे फोटो सर्वत्र पसरले असल्याने त्याच्या आयुष्यामध्ये वेगळ्या प्रकारचा घोळ निर्माण झाल्याचे समोर आले आहे. छत्तीसगडमधील रहिवासी असलेल्या या कनोजियाचे काही काळ वास्तव्य मुंबईत होते आणि त्यावेळी त्याच्यावर काही किरकोळ गुन्हेही दाखल झाले होते. त्या आधारे पोलिसांनी त्याला रायपूरमध्ये जाऊन अटक केली. पण नंतर या गुन्ह्याशी त्याचा तसा काही संबंध नसल्याचे लक्षात आले तेव्हा त्याची सुटका केली. त्यानंतर कोणताही गुन्हा केला नसतानाही विनाकारण एक सामाजिक शिक्षा मात्र या कनोजियाच्या नशिबी आल्याचे दिसत आहे.कारण त्याचे नुकतेच लग्न ठरले होते आणि आता त्याच्या वधूने त्याच्याबरोबर लग्न करायला नकार दिला आहे. त्याशिवाय तो ज्या ठिकाणी कामाला जात होता तेथील मालकानेही त्याला कामावर ठेवून घेण्यास नकार दिला आहे. या दुर्दैवी तरुणाच्या घरात अन्य कोणीही नोकरीला नाही आणि सर्वांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्याच्यावरच आहे. पण पोलिसांनी केलेल्या चुकीच्या तपासामुळे त्याचे संपूर्ण आयुष्यच बदलून गेले आहे. आता पोट भरण्यासाठी मला कोणीतरी नोकरी द्यावी म्हणून मी आता सैफ आली खानच्या घरासमोरच आंदोलन करणार आहे, अशी घोषणा त्याला करावी लागली आहे. इतक्या मोठ्या आणि बहुचर्चित गुन्ह्याचा तपास करत असताना अशा प्रकारच्या चुका अपेक्षित नसतात. पण जर अशा चुका झाल्या तर त्या दुरुस्त करण्याचे कामही पोलीस खात्यालाच करावे लागणार आहे.पोलिसांनी तपासात केलेल्या घोळामुळे एका तरुणाची जी मानसिक, आर्थिक आणि सामाजिक ओढाताण झाली आहे त्यावर आता महाराष्ट्र सरकारच्या गृहखात्यालाच उत्तर द्यावे लागणार आहे. अशा प्रकारे एखाद्याला चुकीच्या पद्धतीने अटक केल्यानंतर काही काळाने चूक लक्षात आल्यावर त्याला मुक्त केले की पोलिसांचे काम संपले असे नाही हेच या प्रकरणावरून सिद्ध होते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे राज्यात सोमवारी ज्या मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनचे मोठा गाजावाजा करून उद्घाटन करण्यात आले त्या फॉरेन्सिक तंत्रज्ञानात सीसी टीव्हीचे फूटेज तपासणी हा विषयही येतो. प्रत्यक्ष गुन्हेगार असलेला फकीर नावाचा बांगलादेशी निर्वासित आणि चुकीने पकडलेला हा कनोजिया नावाचा भारतीय तरुण यांच्या चेर्हयामध्ये असे कोणते साम्य या फॉरेन्सिक तंत्रज्ञानाला सापडले की चुकीने या भारतीय तरुणाला अटक करण्यात आली याचे उत्तरही आता गृहखात्याला द्यावे लागणार आहे.सैफ अली खान वरील हल्ल्यासारख्या प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर तपासाचा दबाव असल्यामुळे अधिकार्यांना गुन्हेगारापर्यंत पोहोचण्याची घाई असते. त्यामधून अशा प्रकारच्या चुका होत असल्या तरी या चुकांमुळे कोणाचे आयुष्य बरबाद होत असेल तर जबाबदारीसुद्धा पोलिसांनाच घ्यावी लागणार आहे. या प्रकरणात हा चुकीच्या तपासाचा घोळ किमान समोर तरी आला आहे. पण राज्याच्या कानाकोपर्‍यात छोट्या छोट्या शहरांमध्ये अशा प्रकारचे तपासाचे घोळ नेहमीच चालू असतात. खोटी अटक दाखवून एखाद्या प्रकरणाचे महत्त्व आणि चर्चा कमी करण्याचे काम नेहमीच केले जाते.जेव्हा मटका अड्ड्यावर आणि दारू अड्ड्यावर धाडी घातल्या जातात तेव्हासुद्धा अटक केलेल्या लोकांची नावेही ठरलेली असतात आणि कोणी अटक करून घ्यायची हेसुद्धा ठरलेले असते हे एक उघड गुपित असते. अर्थात दारू आणि मटका अड्ड्यावरील धाडीमध्ये पकडण्यात आलेले हे जे गुन्हेगार असतात त्यांना अशा प्रकारच्या चुकीच्या तपासाची आणि चुकीच्या अटकेची सवयच असते. पण कनोजियासारखा एखादा सर्वसामान्य तरुण जेव्हा चुकीचा तपासाचा बळी ठरतो तेव्हा मात्र तो विषय गांभीयार्ने घ्यावा लागेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच आता कनोजियाला न्याय देऊन त्याचे योग्य पुनर्वसन करायला हवे.

# बाल विवाह समस्येचे उच्चाटन व्हावे

बाल विवाहावर कायदेशीर बंदी असतानाही आज बाल विवाह कमी होताना दिसत नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात बाल विवाह झाल्याची एखादी तरी बातमी असतेच. महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यातही बाल विवाहाचे प्रमाण लाक्षणिक आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला हे भूषणावह नाही. लॉक डाऊनमध्ये तर बालविवाहाचे प्रमाण खूप वाढले होते आता सर्व सुरळीत सुरू झाल्यानंतर तरी बाल विवाहाचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते मात्र अजूनही राज्यात बाल विवाह होत आहेत. अर्थात इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील बाल विवाहाचे प्रमाण कमी आहे ही समाधानाची बाब असली तरी बाल विवाह पूर्णतः रोखण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला आहे हे मान्यच करावे लागेल. मागील वर्षी द लांसेट ग्लोब हेल्थ या शोध पत्रिकेत एक अहवाल प्रकाशित झाला. या अहवालात आपल्या देशातील बाल विवाहाचा सद्य स्थितीवर बोट ठेवण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील काही राज्ये तसेच केंद्र शासित प्रदेशांमध्ये २०१६ ते २०२१ या कालावधीत बाल विवाहाची कुप्रथा सामान्य बनली असल्याचा दावा केला आहे. बाल विवाहामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसल्याचेही या अहवालात म्हंटले आहे याचाच अर्थ देशात आजही बालविवाह होत आहेत. राज्यातही होत आहेत. राज्याच्या विविध विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये मागील चार वर्षामध्ये अल्पवयीन मातांची संख्या १२, २५३ इतकी आढळून आली आहे. या आदिवासी जिल्ह्यांत १८ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या गर्भवती मातांची संख्या देखील लाक्षणिक आहे. बाल विवाहाची प्रथा काही आदिवासी जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या सुरू आहे. हा परंपरेचा भाग असला तरी पुणे मुंबई सारख्या शहरात आणि राज्याच्या ग्रामीण भागातही बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या देशात मुला मुलींच्या लग्नाचे वय कायद्याने ठरवून दिले आहे. मुलांचे लग्नाचे वय २१ तर मुलींच्या लग्नाचे वय १८ असावे असे कायदा सांगतो त्यापेक्षा कमी वयात विवाह झाला तर तो बाल विवाह समजला जातो. २००६ साली केंद्र सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा नव्याने मंजूर केला. मात्र सरकारने मंजूर केलेल्या कायद्यानुसार बाल विवाहास कठोर शिक्षेची तरतूद आहे. मात्र या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने या कायद्याचा धाक राहिला नाही. बाल विवाह झालेल्या मुला मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकलावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे जन्माला येणारे बाळ देखील सशक्त नसते. बाल वयातच आई झालेल्या मुलीला देखील आरोग्याच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे कुपोषणासह अनेक रोगांना त्यांना सामोरे जावे लागते. आज आपला देश सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाईल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावर देखील आपण स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशात आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेड्यापाड्यातील मुली बाल विवाहाला बळी पडत आहेत. ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बाल विवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बाल विवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सवार्नाच जागृत करणे गरजेच आहे. भारतात बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे जमा करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी असा नियम केला तर बाल विवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बाल विवाह होऊ नये यासाठी विविध स्तरातून जनजागृती करावी. ज्याप्रमाणे अस्पृश्यता, सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, केशवपन या अनिष्ट चालीचे उच्चाटन झाले त्याप्रमाणे बाल विवाहाचे देखील उच्चाटन व्हायला हवे.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

पान १ वरून

## खरं सांगा एकनाथराव बच्च...

झुलवत ठेवतो तसे देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंनी बच्चू कडूंना झुलवत ठेवले. या दोघांनी त्यांचा आवाज बोथट केला. त्यांचा बुलंद आवाज शांत केला. शेवटी विधानसभेतही त्यांचा ठरवून पराभव केला. विधानसभेच्या निवडणूकीत प्रचंड मताधिक्याने अनेक भणंग निवडूण आले. ज्यांचे नाव गांव व कामसुध्दा लोकांना माहित नव्हते असे गणंग नेटाने निवडूण आले पण बच्चू कडू पडले, हे कसं काय ? बच्चू कडूंचा ठरवून गेम केला गेला. बच्चू कडूंना एक नवखा माणूस पाडू शकतो ? ज्याचं फारसं काम नाही, योगदान नाही असा माणूस पाडू शकतो हे कसं काय ? एकनाथराव, खरं सांगा बच्चू कडूंचा गेम कोणी केला ? देवाभाऊ आणि तुम्ही दोघांनी मिळून केला की सवार्नी मिळून केला, नेमकं काय ? हे सत्य नसेल तर बच्चू कडूंना विधान परिषदेवर घेवून त्यांना दिव्यांग मंत्रालयाचे कॅबिनेट मंत्री का करत नाहीत ? तुम्हाला बच्चू कडूंना संपवायचेच होते काय ?

आजवर चळवळीतले लढणारे सगळे नेते असेच संपवले गेले. सत्ताधा-यांनी या नेत्यांची अक्षरशः वाट लावली. राजू शेट्टी, सदाशिव खोत, महादेव जानकर वगैरे नेत्यांची आधीच वाट लावली होती. त्यात बच्चू कडू कसेबसे तग धरून होते पण त्यांचीही अखेर तीच अवस्था केली. सगळा दोष सत्तेचा व सत्ताधा-याचांच आहे असे अजिबात नाही. चळवळीतल्या या नेत्यांनीही चुका केल्या आहेत. सत्तासुंदरीने दाखवलेल्या 'मांडी' ला हे गडी भुलले आहेत. केवळ मांडीवरच यांची विकेट पडली आहे. बाकी काहीच यांच्या हाती लागले नाही. केवळ मांडी दर्शनावरच यांचा कार्यक्रम केला गेला. बच्चू कडू दिव्यांग मंत्रालयाचे कारण सांगत असले, गुवाहटी कांडाच्या निर्णयाचे समर्थन करत असले तरी त्यांचा निर्णय चुकला होता हेच खरे. त्यांनी सामान्य जनतेचा विश्वास तोडत अभद्र युती केली होती. त्यांनी असंगाशी संग केला होता आणि तोच त्यांच्या अंगलट आला हेच खरे आहे. उध्दव ठाकरेंनी त्यांना मंत्रीपद दिले होते. मंत्री असताना त्यांना कोणतेही उठावदार काम करता आले नाही, ना स्वतःचा पक्ष वाढवता आला, ना स्वतःची संघटणा ताकदीने बाधता आली. मंत्रीपदाच्या काळात त्यांनी पक्ष-संघटणेकडेही गांभियार्ने लक्ष दिले नाही. त्यांना दाखवलेले सत्तेचे खोटे स्वप्न त्यांचा घात करणारे ठरले. बच्चू कडू लबाडांच्या टोळीत घुसले. त्या आधी ते स्वतंत्र होते. त्यांचा कुणी नेता नव्हता. त्यांचे कुणी हायकमांड नव्हते. ते एकटेच होते पण वाघासारखे होते. एकटे बच्चू कडू म्हणजे अख्खा विरोधी पक्ष वाटायचे. त्यांनी सांगितले की मी देवेंद्र फडणवीसांच्या एका कॉलवर गुवाहटीला गेलो. तिथेच त्यांची प्रतिमा धुळीस मिळाली. बच्चू कडू सत्तेसाठी असे करतील, राज्याबाहेर पळून जातील असं सामान्य जनतेला अजिबात वाटत नव्हतं. लोकांचा त्यांच्यावर प्रचंड विश्वास होता. जनतेच्या सत्ताविरोधी प्रक्षोभाचे, असंतोषाचे ते अनभिषक्त नायक होते. शिंदे आणि फडणवीसांनी या नायकाचा पध्दतशीरपणे खलनायक केला.

या सगळ्या प्रकरणात बच्चू कडूंपेक्षा शेतक-यांचे, वंचीतांचे, अंध-अपंगांचे नुकसान जास्त झाले आहे. बच्चू कडूंचा पराभव हा त्यांचा एकट्याचा नाही. बच्चू कडूंचे आजवरचे काम पाहता असा माणूस पडणे हाच चांगूलपणाचा पराभव आहे पण तो झाला. बच्चू कडूंनी केलेले काम मैलाचा दगड ठरणारे आहे. त्यांची एक चुक त्यांना महागात पडली. "तेलही गेले आणि तुप ही गेले !" अशी त्यांची आज अवस्था आहे. बच्चू कडू म्हणजे कुणी नेता नव्हे तर सामान्य माणसाचा बुलंद आवाज होता, जो सभागृहात तोफेसारखा धडधडत होता. अजून वेळ गेली नाही, सर्व काही संपले नाही. बच्चू कडूंनी आत्मपरिक्षण करावे. पुन्हा नव्या जोमाने कामाला लागावे. झालेल्या चुकीतून सावरावे. ( जर आपण चुकलो आहे असे वाटत असेल तर ) मायबाप जनतेची माफी मागून पुन्हा रणांगणात उतरावे. त्यांचासारखा योध्दा जेव्हा मैदानात उतरतो तेव्हा यश दुर पळत नाही. त्यांचा गेम ज्यांनी ज्यांनी केला त्यांचा गेम जनता केल्याशिवाय राहणार नाही पण बच्चू कडूंनी पुन्हा जनतेचा आवाज व्हायला हवे. पुन्हा नव्या जोमाने मैदानात उतरायला हवे. आज विरोधी पक्ष क्षिण झाले आहेत. त्यांचा आवाज दबला आहे. हिच बच्चू कडूंसाठी मोठी संधी असू शकते. बच्चू कडूंनी स्वतःचा पक्ष ताकदीने व गांभियार्ने बांधत हा आवाज बुलंद करत सरकारला दे माय धरणी ठाय करून सोडावे. त्यांच्यात ती क्षमता नक्कीच आहे.

## हार्वेस्टर मालकांचे पैसे...

वाल्मिक कराडच्या पत्नीच्या जमिनीचा ताबा घेण्याची भूमिका घेतली आहे.

ऊसतोडणी करणाऱ्या हार्वेस्टरला अनुदान मिळवून देतो असे सांगून शेतकऱ्यांना 11 कोटी 20 लाख रुपयांची टोपी घालणाऱ्या वाल्मिक कराडने पैसे परत न दिल्यास त्याच्या दुसऱ्या बायकोच्या नावावर असलेल्या बार्शी येथील जमिनीचा ताबा घेऊ असा इशारा जनशक्ती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अतुल खुपसे पाटील यांनी दिला आहे. राज्यातील जवळपास 145 शेतकऱ्यांना अनुदान देतो म्हणून प्रत्येकी आठ लाख रुपये कराडच्या माणसाकडून गोळा करण्यात आले होते.

मात्र, अनुदानच न मिळाल्याने जेव्हा हे शेतकरी आपले पैसे परत मागायला गेले तेव्हा त्यांना धमकावल्याने ते घाबरून परत फिरले होते.

यानंतर या शेतकऱ्यांनी पोलिसात धाव घेत तक्रारी अर्जही दिले मात्र अजूनही याबाबत कारवाई होत नसल्याने संतप्त झालेल्या शेतकरी संघटनेच्या नेत्याने आता वाल्मीक कराडच्या दुसऱ्या पत्नीच्या नावावर असणारी बार्शी तालुक्यातील शेंद्री येथील जमीन ताब्यात घेणार असल्याचे सांगितले.

वाल्मिक कराडची दुसरी पत्नी ज्योती जाधव हिच्या नावावर बार्शी तालुक्यात 35 एकर जागा असल्याचे उघड झाले होते. आता या सर्व हार्वेस्टर मालकांची मीटिंग करमाळा येथे होणार असून यामध्ये पहिल्यांदा बार्शीची शेतजमीन ताब्यात घ्यायची आणि त्यानंतरही पैसे पूर्ण न झाल्यास पुण्यातील कराडची प्रॉपर्टी ताब्यात घेऊ असा इशारा अतुल खूपसे यांनी दिला आहे. पुढील.

सात दिवसाच्या आत शासनाने कराडची संपत्ती ताब्यात घेऊन हार्वेस्टर मालकांचे पैसे द्यावेत, अन्यथा बार्शी तालुक्यातील दुसऱ्या

पत्नी ज्योती जाधव हिच्या नावावर असलेली शेतजमीन ताब्यात घेणार असल्याचे सांगितले. शेतकऱ्यावर होणारा अन्याय खपवून घेतला जाणार नाही वेळप्रसंगी पुणे आणि बीड येथील संपत्तीवर हार्वेस्टर मालकासहित ताबा घेणार असल्याचा इशाराही खूपसे पाटील यांनी दिला आहे.

पान १ वरून

## मुख्य कार्यकारी अधिकारी...

हाय रिक्स ग्रुप मधील महिलांना घरकुल योजना, संजय गांधी निराधार योजना, बाल संगोपन योजना साठी आवश्यक कागदपत्रांच्या अडचणी सोडविण्यासाठी कॅम्प आयोजित करण्याच्या सूचना यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी दिल्या.

जिल्हास्तरीय स्थायी लेखा परिक्षण बैठकीत लेखा परिक्षणात आढळून आलेल्या आक्षेपांची पूर्तता करुन लवकरात लवकर ऑडिट पॅरे निकाली काढावेत. लेखा परिक्षणात वसुली असेल तर तात्काळ वसुलीबाबतची कार्यवाही पूर्ण करावी, अशा सूचना यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी बैठकीत दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी विविध विभागाच्या अडचणी समजावून घेतल्या. अडचणी तात्काळ दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, याबाबत सर्व विभागांना आश्वस्त केले.

## प्रबोधन

# आम्ही सारे एक । म्हणायला शिका

जो भूतकाळात हरवलेला असतो तो वृद्ध ही व्याख्या केवळ वृद्धांची नाही, तर वृद्धसदृश अनेकांची असते, आणि केवळ व्यक्तींचीच नव्हे, तर समाजाची आणि राष्ट्रांचीही असते. जगातील सारी अविकसित आणि विकसनशील राष्ट्र भूतकाळात जगणारीच आहेत. त्यामुळेच ती जीर्ण मताभिमानी, नवमतद्वेष्टी, पुराणपंथी मनोवृत्तीची अर्थात वृद्ध असतात. 'भारत हा देश आत्मकेंद्री असून त्याचं सामाजिक भान फार दुबळं आहे असं वृद्धांना शोभेलसं भारताचं वर्णन एका विचारवंताने केलंय, ते काही चुकीचं नाही. त्यामुळेच अशा देशात कॅलेंडर बदललं म्हणजे नवं वर्ष येतं, असं म्हणणं चुकीचं असतं. डिसेंबरमध्ये सिद्धी-साईदर्शनाला जेवढी गर्दी झाली, तेवढीच जानेवारीतही झाली असेल, तर नवं वर्ष आलं आणि जुनं वर्ष गेलं, असं कसं म्हणता येईल?

भारतीयांची स्थितीशीलता पुरोगामी कवी विंदा करंदीकर यांनी हेरली होती. आपल्या तेच तें, तेच तें कवितेतून त्यांनी ती व्यक्त केली आहे. त्यांच्यासारख्यांना जुन्याच्या जागी नवीन काही स्थापन करता येत नसेल, तर दुःख होणं स्वाभाविक असतं. नव्या युगाचं स्वागत नव्या पद्धतीने नको करायला? कारण-

धमार्चे गोठोडे। घेऊनिया तुम्ही। नव्या
युगामाजी। कसे जाता?।। डोईवर देव।
नाही चालायचे। नव्या कायद्याचे। भान
ठेवा।। माणुसकी हाथ। मंत्र हवा ओठी। दार
तुम्हासाठी। उघडाया ।। टिळे, माळा, शेंडी।
दाढी सारे व्यर्थ। संप्रदाया अर्थ। नसे हीन ।।

भविष्यकाळ जर माणुसकीचाच असेल, तर माणुसकीला काळे फासणाऱ्यांना नव्या वषार्चेही दार उघडणार नाही आणि नव्या युगात तर त्यांना मुळीच प्रवेश मिळणार नाही. नवं युग जर दैव-देव-धमार्तीत, धर्महीन, धर्मविरहित समाजाचं असेल तर, देव धर्माभिमान्यांना, धमार्हकाऱ्यांना नव्या युगात जाता येणार नाही. धर्ममुक्तीच्या मोकळ्या ताज्या हवेने धर्ममार्तंड मात्र गुदमरून जातील यात वाद नाही. धर्मावलंबी परोपजीवी शोषणकर्त्यांना स्वतःच्या जगण्याचं कोणतंच साधन शिल्लक नसलेलं वातावरण परवडेल? नवं समतेचं जग मात्र त्यांना आग्रहपूर्वक सांगेल की

जातीरंगभेद। विसराया हवा।
समतेचा गाया। नवा मंत्र।।
नवे युग आहे। भरले शांतीने।
सुख-समृद्धीने। काठोकाठ ।।

जातिभेद, रंगभेद सोडणे शक्य आहे? उच्च जातीचं विष मस्तकात भिनलेले लोक नव्या वर्षात जाऊ नयेत, हे खरं. पण ते नव्या वर्षात अनाधिकार प्रवेश करतात आणि नवे युग त्यांच्या संसगार्ने दूषित होतंच! उच्च जातीच्या घमेंडीने टणक झालेल्या रूक्ष भूमीत समतेची-ममतेची सहिष्णुतेची बिजे रुजतील? सामंती थाटाने ज्यांचं डोकं बिघडलं आहे, ते सामान्य माणसाला बंधुत्वाने वागवतील? आजपर्यंत त्यांना जे शक्य झालं नाही, ते आज नवं वर्ष आलं म्हणून शक्य होईल? कदापि नाही! जे लोक सामान्य-

समाजाशी एकरूप होणार नाहीत, त्यांना नव्या युगाच्या दारात अडवून माघारी परत पाठवायलाच हवे. अडवायला हवे. आपल्यापासून झटकायलाही हवे. कारण ह्या ढॉग्यासोंग्याची दृष्ट सावली पडूनच सामान्य माणसं बिघडतात, नाही तर मूळची ती किती तरी निर्मक असतात. धर्म, पूजास्थान, दर्जा, वंश, खानदान, घराणे असा कोणताच अभिनिवेश त्यांच्यात नसतो. त्यांना आपला धर्मग्रंथसुद्धा माहिती नसतो आणि माहिती असण्याची गरजही त्यांना भासत नाही. नाहीतरी नव्या काळाची आव्हानं पेलण्यास असमर्थ असलेले धर्मग्रंथ माहीत असून तरी काय उपयोग? जग क्षणाक्षणाला बदलत असताना धर्मग्रंथ प्रत्येक दिवशी अद्ययावत करणं आवश्यकच आहे. तरीही

शतकानुशतके। एक धर्मग्रंथ।
बत्तता उराशी। धरुनिया ।।
काळाची आव्हाने। पेलण्या समर्थ।
नवा धर्मग्रंथ लिहा शेण ।।

हा नया धर्मग्रंथ मानवतावादाचा असावा. गाडगेबाबांनी तो दिला आहे. त्यांचा धर्म उपेक्षितांच्या मूलभूत गरजा पुरवण्याविषयी होता. खरं तर, श्रीमंतांचा धर्मग्रंथ गरिबांना उपयोगी नसतो. पुरुषांचा धर्मग्रंथ स्त्रियांना चालत नसतो. म्हणूनच कालचा धर्मग्रंथ आज निरुपयोगी ठरतो. मात्र या बदलात समतेचे नियम कधीच कालबाह्य होत नाहीत, माणुसकी नवी जुनी नसते. म्हणूनच नववषार्ला सामोरं जाताना नवे संकल्प, नवे विचार, नवं आचरण स्वीकारावंच लागतं. यासाठी-

जन्मोत्सव आता। शास्त्रज्ञांचे करा।
बुद्ध गांधी स्मरा। सदोदित ।।
संशोधनसंस्था। आणि विद्यापीठे।
सार्थक भेटते। त्यांच्या ठायी ।।
उद्योगी शहरे। हीच तीर्थक्षेत्रे।
विकासा लाभते। जेथे गती ।।

मानवहिताची एखादी युक्ती नववर्षाची भेट घेताना आपल्या हाती असलीच पाहिजे. सामाजिक समस्यांच्या एखाद्या उत्तराशिवाय नव्या वषार्ला भेटून काय लाभ? नव वषार्ला आपणाकडून हवी असते मानवकल्याणाची एखादी तरी कृती. नवं वर्ष म्हणते, मानवी विकृतीवर औषध शोधा मग मला भेटा. नवं वर्ष विचारते, हिंसेला प्रोत्साहन देणारी धार्मिकता तुम्ही कधी नष्ट करणार? नवे वर्ष म्हणते, माज्या भेटीला येताना गरिबांसाठी एक भाकरी आणि त्यांना हसवण्यासाठी एक फूल आणा. माझी एवढी अपेक्षा पूर्ण कराल? यासाठी कृपा करून लक्षात घ्या-

वाजतसे डंका। एका कुटुंबाचा।
विश्वबंधुत्वाचा। नव्या युगी ।।
जाती-धर्म-भेद। त्यागाचा संदेश।
करी उपदेश। नवे युग ।।
'आम्ही सारे एक। म्हणायला शिका।
धर्म सांगू नका। विसरा तो ।।
आवश्यक नाही। आता धर्म कोणा।
धर्माच्या वल्गना। नको आता ।।
सर्व जगातील। मानव तो एक।
धर्म आहे एक। मानयता ।।
पुसूनिया टाका। देशांचीही नावे।
पृथ्वी एक आहे। सर्वांची ही।।
वेगळ्या धर्माच्या। मांडुनिया चुली।
राहातील सारी। उपाशीच।।



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# मराठा सेवा संघाच्या शिवधर्म दिनदर्शिकेचे आ. अभिजित पाटील यांच्या हस्ते प्रकाशन



**माढा (कटूसत्य वृत्त)**:- मराठा सेवा संघाच्या शिवधर्म या राष्ट्रीय दिनदर्शिकेचे प्रकाशन आमदार अभिजित पाटील यांच्या हस्ते माढ्यात करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे राज्य संघटक दिनेश जगदाळे, मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख, तालुका उपाध्यक्ष शिवानंद बारबोले, शिक्षक सहकार संघटनेचे तालुकाध्यक्ष शिवाजी कदम, डॉ.बालाजी शिंदे,नितीन कापसे,शंभूराजे साठे, बालाजी परबत यांच्यासह मराठा सेवा संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मराठा सेवा संघाच्या शिवधर्म दिनदर्शिकेचे आमदार अभिजित पाटील यांनी कौतुक करीत महाराष्ट्रात पुरोगामी विचारधारा घरोघरी पोहचविण्यासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पुरूषोत्तम खेडेकर साहेबांच्या विचारांतून तयार झालेल्या शिवधर्म दिनदर्शिकेचा फार मोठा फायदा झाल्याचे सांगितले. मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष निलेश देशमुख यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# गणपती फार्मसीची एस. जी.फाइटो औषध निर्माण कंपनीला भेट



**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त)**:- मौजे अकोले खुर्द तालुका माढा येथील श्री गणपती फार्मसी महाविद्यालयातील डी.फार्मसी विद्यार्थ्यांनी कोल्हापूर मधील एस. जी.फाइटो औषधनिर्माण कंपनीला भेट दिली अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रूपाली बेंदगुडे यांनी दिली. भेटी दरम्यान विद्यार्थ्यांना एस जी फाईटो मधील व्यावसायिकांचे निरीक्षण करण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. तसेच फार्मासिटिकल क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान आणि पद्धती बद्दल देखील माहिती मिळाली. त्यावेळी विद्यार्थ्यांनी कंपनीतील प्रोडक्शन, पॅकेजिंग, वेअर हाऊस, कॉलिटी कंट्रोल, रिसर्च अँड डेव्हलपमेंट अशा विविध डिपार्टमेंटला भेट दिली व त्यांच्या शंकांचे निरसन ही करण्यात आले. संपूर्ण भेटीदरम्यान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अनुभवाला मार्गदर्शन करण्यात सोबत असलेल्या शिक्षकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ही भेट विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाच्या पलीकडे विस्तारित असलेल्या चांगल्या गोलाकार शिक्षणासह सुसज्ज करणे संस्थेच्या व्यापक धोरणांचा एक भाग होता. एस. जी. फाइटोला दिलेली ही भेट एक अविस्मरणीय आणि समृद्ध अनुभव देणारी ठरली. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. रवींद्र बेंदगुडे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रूपाली बेंदगुडे प्रा. शैलेश पेंडोर, प्रा. रूपाली राऊत, प्रा. पूजा शिरसकर उपस्थित होते.

## वात्रटिका

### रेवड्या वाटप

निवडून यायचे म्हणून
रेवड्या वाटप केल्या...
विचार न करता त्यांनी
तिजोरी खाली केल्या...
विकास दुरावला आणि
भाऊ सुद्धा हिरमुसला...
लाडक्या बहिणीचा तर
आता पारा चढला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र सोयाबीन खरेदीत नंबर 1 वर

**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** सोयाबीन खरेदीसाठी राज्यातील तब्बल 07 लाख 64 हजार 731 शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील 03 लाख 69 हजार 114 शेतकऱ्यांनी तब्बल 07 लाख 81 हडार 447 मेट्रिक टन सोयाबीन खरेदी केली असल्याची माहिती समोर आली आहे.



महत्त्वाची बाब म्हणजे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी सोयाबीन खरेदीच्या बाबतीत मध्यप्रदेश, राजस्थान, कर्नाटक, गुजरात, तेलंगणा या राज्यांना मागे टाकले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी सोयाबीन खरेदीमध्ये प्रथम क्रमांकावर असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली आहे. सोयाबीन खरेदीचा वेग पाहता यासाठीची मुदत वाढवण्याची गरज भासल्यास केंद्र सरकारकडे मुदत वाढवून मागीतली जाईल, असे मंत्री रावल यांच्याकडून सांगण्यात आले आहे. प्रसार माध्यमांना सोयाबीन खरेदीबाबत माहिती देताना पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, अनेक जिल्ह्यांनी आपले खरेदी उद्दिष्ट पूर्ण केले आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला अडचण येऊ नये यासाठी वेगाने सोयाबीन खरेदी प्रक्रिया करण्याची तसेच दोन ते तीन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम पोहोचेल या संदर्भात वेगाने कार्यवाही करण्याच्या सूचना यंत्रणेला दिल्या आहेत. 31 जानेवारी 2025 पर्यंत खरेदी चालू राहणार असल्याने सोयाबीन खरेदीच्या आकडेवारीत मोठी वाढ दिसेल. तथापि, सोयाबीन खरेदीची मुदत वाढवण्याची गरज भासल्यास केंद्र सरकारकडे मुदत वाढवून मागीतली जाईल. राज्यात नाफेड व एनसीसीएफ अंतर्गत सहा राज्यस्तरीय नोडल एजन्सीच्या माध्यमातून ही सोयाबीन खरेदी सुरू आहे.

तसेच, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी 01 ऑक्टोबर 2024 पासून यासाठी नोंदणी सुरू केली होती. त्यानुसार 15 ऑक्टोबर 2024 पासून राज्यातील 562 खरेदी केंद्रांवर प्रत्यक्ष खरेदी सूरू करण्यात आली आहे. नोंदणी करता येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे नोंदणीची मुदत एक वेळा वाढवली. त्यानंतर सुरुवातीला सोयाबीन खरेदीची मुदत 12 जानेवारी 2025 पर्यंत होती. मात्र या मुदतीत अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी न झाल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांना विनंती करून खरेदीची मुदत दि. 31 जानेवारी 2025 पर्यंत वाढवली आहे, अशी माहिती मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. तर, मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, गुजरात, . तेलंगणा या प्रमुख सोयाबीन उत्पादक राज्यात खरेदीच्या तुलनेत महाराष्ट्राने आतापर्यंत सर्वाधिक खरेदी केली आहे. या सहा राज्यांची एकूण खरेदी 18 लाख 68 हजार 914 मेट्रिक टन इतकी झाली असून एकट्या महाराष्ट्राने 07 लाख 81 हजार 447 मेट्रिक टन खरेदी केली असल्याचेही मंत्री रावल यांच्याकडून सांगण्यात आले. राज्यात नांदेड जिल्ह्यात 57 हजार 528 शेतकऱ्यांकडून 1 लाख 290 मेट्रिक टन इतकी सर्वाधिक सोयाबीन खरेदी झाली आहे. त्यानंतर, हिंगोली जिल्ह्यात 29 हजार 764 शेतकऱ्यांकडून 60 हजार 989 मेट्रिक टन सोयाबीनची खरेदी झाली.

सुरुवातीच्या काळात आलेल्या सर्व तांत्रिक अडचणी दूर करून आजही वेगा खरेदी प्रक्रिया सुरू असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले. केंद्र सरकारने सन 2024–25 करीता सोयाबीनसाठी प्रति क्विंटल 4 चार 892 रुपये इतका हमीभाव घोषित केला असून त्यानुसार खरेदी सुरू आहे.

हे दर मागील वर्षाच्या हमीभावापेक्षा 292 रुपये प्रति क्विंटल इतके जास्त आहे. सन 2024–25 मध्ये लागवडीखालील क्षेत्र 50.51 लाख हेक्टर असून उत्पादन 73.27 लाख मेट्रिक टन अपेक्षित आहे. पीएसएस खरेदीसाठी केंद्र सरकारने 14 लाख 13 हजार 270 (19.28 टक्के) मंजूरी दिली असल्याची माहितीही मंत्री रावल यांनी दिली आहे.

# नेताजी शिक्षण संकुलात ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलात मराठी प्राथमिक शाळा, इंग्लिश मिडीयम स्कूल, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, पालक शिक्षक संघटनेचे सहसचिव बुडप्पा चिकनी, उपाध्यक्षा लक्ष्मी चिलवेरी, माता पालक संघाच्या सदस्या उमा केंचगुंडी, कल्पना जीबटे आदी उपस्थित होते. याप्रसंगी गौरी रॅका यांना आदर्श माता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रगीत, राज्य



गीत, ध्वज गीत, संविधान, संचलन, कवायत, दिन विशेष, स्फूर्ती गीत, विद्यार्थ्यांचे भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम अशा क्रमाने कार्यक्रम शिस्तबद्ध पार पडली. खाऊ वाटपाची कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थ्यांनी देश आमुचा महान, संविधानवर नाटिका, ओ देश मेरे शान पे सदके, जयस्तुते, मेरी कर्मा तू मेरी धर्मा आदी विविध देशभक्तीपर स्फूर्ती गीत सादर केले. श्रीधर बत्तुल, साईकुमार केंचगुंडी, लखन मिठ्ठा, मोहित सिरसुल्ला, श्रावणी सिरसुल्ला, आराध्य जमादार, मनीषा चिरमाडे, श्राव्या नडगेरी, आदित्य बिराजदार, समृद्धी कुडक्याल, श्रुती मोरे, सुप्रिया अलदी, तनुजा चिरमाडे, कीर्ती निलगार, हरिप्रिया चिप्पा, सौम्या लगशेट्टी, लक्ष्मी आडम, प्रतीक्षा हंचाटे, शुभम सरवदे, उमा बिटला, रक्षिता सुकंनपल्ली, सत्यभामा काळे, यशोदा पुजारी, निशा मुसळे, अंकिता कस्तुरी व अथर्व कोल्हापूरे आदी या विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्व सांगितले. कार्यक्रमांचे सुत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले तर शिवानंद पुजारी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यातील उत्कृष्ट रेशीम कोष उत्पादक शेतकऱ्यांना पुरस्कार प्रदान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** उत्कृष्ट रेशील कोष उत्पादन घेणाऱ्या व रेशीम शेतीतून लक्षाधीश झालेल्या शेतकऱ्यांना मा. पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र व सन्मान चिन्हे प्रदान करण्यात आले असल्याची माहिती रेशीम विकास अधिकारी विनित पवार यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातील 11 तालुक्यामध्ये 1 हजार 17 शेतकऱ्यांकडे 1 हजार 260 एकरावर रेशीम उद्योग चालू असून त्यापैकी मौजे निमगाव ता.माळशिरस येथील शेतकरी जगन्नाथ पंढरीनाथ मगर यांनी घेतलेली अंडीपुंज संख्या–2 हजार 200, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. 1 हजार 760, प्राप्त रक्कम 10 लाख 8 हजार 480 रुपये व जयसिंग साहेबराव मगर यांनी घेतलेली अंडीपुंज संख्या–2 हजार 800, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. 2 हजार 110, प्राप्त रक्कम 11 लाख 34 हजार. रुपये, हणमंत तुकाराम सांगोलकर मौजे भंडीशेगाव ता.पंढरपूर यांनी घेतलेले अंडीपुंज संख्या–3 हजार 200, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. 2 हजार 257 प्राप्त रक्कम 13 लाख 20 हजार 345 रुपये, वैभव भिमराव काळे मौजे कंदर ता. करमाळा, यांनी घेतलेले अंडीपुंज संख्या– 3 हजार, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. 2 हजार 680 प्राप्त रक्कम 14 लाख 7 हजार 431 रुपय, सौदागर पांडुरंग पांडव मौजे पिरटाकळी, ता. मोहोळयांनी घेतलेले अंडीपुंज संख्या–2 हजार 50, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. 1 हजार 701 प्राप्त रक्कम 8 लाख 33 हजार 490 रुपये तसेच श्रीशैल मलकाप्पा नंदगाव मौजे हत्तीकणबस ता. अक्कलकोट यांनी घेतलेले अंडीपुंज संख्या– 1 हजार 50, रेशीम कोषांचे उत्पादन कि.ग्रॅ. 897, प्राप्त रक्कम 4 लाख 72 हजार 560 रुपये इतकी आहे.

सध्या जिल्ह्यातील महारेशीम नोंदणी अभियान चालू असून रेशीम शेतीसाठी तुती लागवड करण्यास इच्छुक असलेल्या लाभार्थ्यांनी नांव नोंदणी जिल्हा रेशीम कार्यालया मोजे हिरज ता. उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर येथे करावी. तसेच रेशीम उद्योगामधून शेतकऱ्यांनी लक्षाधीत व्हावे. लवकरच सोलापूर जिल्ह्यामध्ये soil to Fabric प्रकल्प राबवीत आहोत. ज्यामुळे रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना सोलापूर जिल्ह्यामध्ये स्वतःचा रेशीम कोष विक्री करणे सोईचे होणार आहे व सोलापूर जिल्ह्यातील कुशल विणकरांना कपडा निमीर्ती पर्यंत रोजगार उपलब्ध होईल. ज्यामुळे सोलापूर जिल्ह्याची आर्थिक उन्नती हाईल. असे आवाहनही जिल्ह्याचे रेशीम विकास अधिकारी विनित पवार यांनी केले आहे.

# पुण्यात 'GBS' चे 101 रुग्ण तर सोलापूरच्या एका व्यक्तीचा मृत्यू

**पुणे (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्रातील पुण्यात 100 हून अधिक लोकांना 'गुइलेन–बरे सिंड्रोम' (GBS) ची लागण झाली आहे. यामध्ये सोलापूर येथील एका व्यक्तीचाही मृत्यू झाला आहे. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाशराव आबिटकर यांनी म्हटले आहे की, संसर्ग रोखण्यासाठी आरोग्य विभाग चांगले काम करत आहे. यासोबतच लवकरच तज्ज्ञ पथक यावर आपले मत देईल अशी माहिती त्यांनी दिली. पुण्यात या रोगप्रतिकारक शक्तीशी संबंधित विकाराने संक्रमित झालेल्यांची संख्या 101 वर पोहोचली आहे, असे आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्यात घडत असलेल्या सर्व घडामोडींवर आम्ही लक्ष ठेवून आहोत. तर बघू आज दिवसभरात काय घडतं दिल्लीत होणाऱ्या विधानसभा निवडणुकीबाबत केंद्रीय मंत्री रामदास आठवले म्हणाले की, दिल्ली निवडणुकीत काँग्रेसला एकही जागा मिळणार नाही. तसेच ते म्हणाले की, पुढील 25 वर्षे काँग्रेस पक्षाला पुन्हा सत्तेत येणे कठीण होईल. महाराष्ट्रात सोमवारी सोलापूरमध्ये गुइलेन–बरे सिंड्रोम (GBS) चे आणखी नऊ रुग्ण आढळले. यामुळे रुग्णांची संख्या आता 111 झाली आहे. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, या रुग्णांमध्ये 73 पुरुष आणि 37 महिलांचा समावेश आहे. तर 17 रुग्ण सध्या व्हेंटिलेटरवर आहे. सविस्तर वाचाबाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात गोळीबार करणाऱ्याने पोलिसांना धक्कादायक गोष्टी सांगितल्या आहे. त्याने हल्ला का करण्याचे आदेश दिले होते आणि त्या बदल्यात त्याला किती पैसे मिळणार होते हे स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातील पुण्यात 100 हून अधिक लोकांना 'गुइलेन – बरे सिंड्रोम' (GBS) ची लागण झाली आहे. यामध्ये सोलापूर येथील एका व्यक्तीचाही मृत्यू झाला आहे. सविस्तर वाचामहाराष्ट्रातील ठाण्यामध्ये एक धक्कदायक बातमी समोर आली आहे. ठाण्यातील इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील अपार्टमेंटवरून पडून एका दोन वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने (EOW) टोरेस इन्व्हेस्टमेंट्स फसवणूक प्रकरणात कंपनीचे सीईओ तौसिफ रियाज यांना लोणावळा येथून अटक केली आहे.

शिवसेना युबीटी नेते संजय राऊत यांनी सोमवारी म्हटले की, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकट्याने महापालिका निवडणुका लढवण्याच्या विधानाचा अर्थ महाविकास आघाडी (MVA) संपुष्टात येत नाही. महाराष्ट्रातील ठाण्यामध्ये एका निवासी संकुलातील 38 वर्षीय सुरक्षा रक्षकाला अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे.


## ग्रामपंचायत मोडनिंब ता.माढा जि.सोलापूर

**टेंडर नोटीस**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील वस्त्यांचा विकास करणे व १५ वा वित्त आयोग सन २०२३–२४ व २०२४–२५ मधील कामांची पेपर निविदा.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | शिंदे वाडा, मोडनिंब येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ५,००,०००/– | ५०००/– | २००/– | ६ महिने | सु.बे.अ |
| २) | आंबेडकर नगर येथे कॉंक्रीट रस्ता करणे | ५,००,०००/– | ५०००/– | २००/– | ६ महिने | सु.बे.अ |
| ३) | वॉर्ड क्र.१ मध्ये आवश्यक ठिकाणी पाणी टाकी, स्टॅन्ड व पाणी पुरवठा सोय करणे | १,५०,०००/– | १५००/– | २००/– | ३ महिने | सु.बे.अ |
| ४) | आंबेडकर नगर येथे गटर दुरुस्ती करणे | २७,९२७/– | २७९/– | २००/– | ३ महिने | सु.बे.अ |
| ५) | वॉर्ड क्र.१ मधील जि.प.शाळा दुरुस्ती करणे | ५,२१,०००/– | ५२१०/– | २००/– | ६ महिने | सु.बे.अ |
| ६) | वॉर्ड क्र.१ मधील भांगे वस्ती येथे पाणी पुरवठा सोय करणे | १,७८,०००/– | १७८०/– | २००/– | ३ महिने | सु.बे.अ |
| ७) | वॉर्ड क्र.१ मधील अंगणवाडी दुरुस्ती करणे | ३,४७,०००/– | ३४७०/– | २००/– | ३ महिने | सु.बे.अ |

टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.३०/०१/२०२५ पासून २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.०५/०२/२०२५ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मोडनिंब ३) निविदा उघडणेचा दि.०६/०२/२०२५ रोजी दु.०२.०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर, नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे. निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/– ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
मोडनिंब, ता.माढा, जि.सोलापूर

शिक्का

सही/– सरपंच
ग्रामपंचायत मोडनिंब,
ता.माढा, जि.सोलापूर


# प्रजासत्ताक दिनानिमित्त शिवशंकर बझार मध्ये तांदुळ महोत्सवाच्या उद्धाटन

## 80 प्रकारचे तांदुळ विक्रीस उपलब्ध

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** शिवशंकर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्थेच्या शिवशंकर बझारमध्ये तांदूळ महोत्सवास उत्साहात सुरूवात झाली. 76 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त या महोत्सवाचे उद्धाटन संस्थेच्या चेअरमन डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते–पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्हा.चेअरमन मदन भगत, संचालक जगन्नाथ धुमाळ, नारायण फुले, कैलास ताटे, अनिल मुंडेफणे, व्यवस्थापक गोपाळराव माने–देशमुख उपस्थित होते.




उद्योगमहर्षि कै.उदयसिंह मोहिते–पाटील यांच्या ध्येय धोरणानुसार ग्रामीण भागात गेल्या 29 वषार्पासून ना नफा ना तोटा तत्वावर सामाजिक बांधिलकी जपत शिवशंकर बझार सहकारी तत्वावर कार्यरत आहे. प्रत्येक वर्षी आयोजित करण्यात येणारा तांदुळ महोत्सव शिवशंकर बझारचे प्रमुख आकर्षण असते. माळशिरस तालुक्यासह आसपासच्या तालुक्यातील चोखंदळ व खवय्ये ग्राहक अवर्जुन या तांदूळ महोत्सवाला भेट देतात.

यावर्षीच्या तांदुळ महोत्सवामध्ये 80 प्रकारच्या विविध नामांकित कंपनींचे तांदूळ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याशिवाय ग्राहकांच्या सोईकरीता विविध प्रकारच्या डिस्काउंट ऑफर सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये सौंदर्यप्रसाधने ज्वेलरी आयटमवर 25% डिस्काउंट, फुटवेअर शुज वर 25% डिस्काउंट, तसेच टॉप लेडीज प्लाजोवर 25% डिस्काउंट देण्यात येत आहे.

हा तांदूळ महोत्सव व डिस्काउंट ऑफर 31 मार्चपर्यंत चालू राहणार असून जास्तीत जास्त ग्राहकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन व्यवस्थापक गोपाळराव माने–देशमुख यांनी केले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २) डोके ३) गुणी, प्रामाणिक वृत्तीचा ४) दह्यात पाणी मिसळून हे तयार करतात ५) जेवणासाठी बसलेली रांग ६) हात ८) एक पक्षी ९) आश्चर्य १०) नगरचे माजी खासदार– *** विखे-पाटील ११) एक भारतीय गोलंदाज-यजुवेंद्र *** १२) शर्ट १३) इच्छा १४) दिलेले आश्वासन, वचन १५) लहान मूल १६) एक मराठी अभिनेत्री-*** प्रभुणे १७) वेडसर (हिंदीत) १८) शर्टची गळ्याभोवतीची पट्टी १९) धावपट्टू (इंग्रजीत) २१) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी २२) वस्तूंवर लावलेला टॅक्स, कर २३) कंबर (हिंदीत) २४) आत, आतील बाजूस (हिंदीत) २५) जवळ, समीप २६) खोलगट २७) काजूच्या जोडीचा एक पौष्टीक पदार्थ २८) दोन आणि अर्धा २९) शिवसेनेचे मुखपत्र ३०) पोट ३१) वायू, वारा ३२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षणसंस्था ३४) शपथ (हिंदीत) ३५) मनुष्य ३६) शंभर धावांचा टप्पा ३७) गाडीची गती ३८) गुलाम ३९) मनी नाही ** अन् देवा मला पाव

**आडवे शब्द :** १) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा ३) खा. उदयनराजे यांचा लोकसभा मतदारसंघ ५) बीडच्या एक नेत्या-*** मुंडे ७) वायर, धातूचा तंतू ८) लहान मुलाचा सांभाळ करणारे आई वडील, एक भाजी प्रकार ९) छोटे शहर ११) एक अंमली नशिला पदार्थ १२) पतीची दुसरी बायको १३) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच १४) स्तुती १५) ढग (हिंदीत) १६) वेळ (हिंदीत) १७) पैंजण (हिंदीत) १८) पूर्वीचा एक साथीचा रोग १९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) हनुमानाच्या हातातील शस्त्र २१) वाहन चालविणारा २२) लालू प्रसाद यादव यांचा पक्ष-राष्ट्रीय *** दल २४) दोन्हीमधील तफावत २५) होकारच्या विरूध्दार्थी २६) विषमच्या विरूध्दार्थी २७) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २८) महाराष्ट्राचे एक नेते -*** पवार २९) शुगर, शर्करा ३०) मोठ्या मनाचा ३१) पडून राहिलेली जमीन ३२) वाळूवर रेषा काढून भविष्य जाणण्याची पध्दत ३३) धमकी देणे, संयम, धीर ३४) संरक्षक आवरण ३५) पत्राचा सुरूवातीचा मजकूर ३७) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ३८) दान करण्याची वृत्ती ३९) शिजवलेला तांदूळ ४०) दोन नद्यांचा मिलाफ ४१) सशाची आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ४२) जावकच्या विरूध्दार्थी शब्द

## सुडोकु – 157

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | 8 | 7 | 1 | | 9 | |
| | | | | 4 | | | | |
| 8 | 9 | 1 | | | 6 | 7 | | |
| 4 | | 9 | 1 | 3 | | | | 5 |
| | 6 | | | 9 | 8 | | 7 | 4 |
| 5 | 3 | 8 | 7 | | | 1 | | |
| | | 3 | | 2 | | 6 | 5 | 8 |
| 2 | | | | 8 | | | | 7 |
| | 8 | 7 | | | 5 | | | 2 |


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
संपर्क: 9881361260

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**
इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...



संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)



**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्अॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# हर्षद कल्याणकर यांस अमेरिका येथील एरिझोना युनिव्हर्सिटी मधून पीएचडी प्राप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील माजी सरकारी वकील एस.आर.पाटील यांचे नातू हर्षद बसवराज कल्याणकर यांस अमेरिका येथील एरिझोना युनिव्हर्सिटी मधून एम एस ( Aerospace/ Aeronautical, Astronautically/ Space Engineering ) या विषयात पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. डिसेंबर 2024 मध्ये झालेल्या पदवी प्रदान सोहळ्यात त्यांना ही पदवी युनिव्हर्सिटीत डिनच्या हस्ते देण्यात आली .

हर्षद कल्याणकर यांचे प्राथमिक शिक्षण मुंबई कांदिवली येथील ठाकूर विद्या मंदिरात तर बी.ई. मेकॅनिकल इंजिनिअरींग मुंबई वसई येथील विद्यावर्धिनी कॉलेज मधून पुर्ण केले, पुढील शिक्षणासाठी ते अमेरिका येथे




गेले, अमेरिकेतील एरिझोना युनिव्हर्सिटी मधून एम.एस. डीग्री (Aerospace/ Aeronautical, Astronaautically/ Space Engineering) या विषयांमधून डिग्री यशस्वीरित्या संपादीत केली. यावरच समाधान न मानता पुढे जावून कोव्हीड-२०२० मध्ये घरा मधून आणि सुरळीत कॉलेज सुरु

झाल्यावर, बऱ्याच अडथळ्यांना धैर्यानी सामोरे जात वरील विषयात पी.एच.डी. डिग्री संपादीत केली. युनिव्हर्सिटीच्या दिक्षांत पदवी प्रमाणपत्र (Convocation Degree Certificate) समारंभात त्यांना DoctorÔte ही पदवी सन २०२४ मध्ये बहाल करण्यात आली. या यशाबद्दल आई सुनंदा, वडील बसवराज कल्याणकर (रा. मुंबई) व आजोबा एडवोकेट एस आर पाटील यांनी हर्षद चे अभिनंदन केले आहे .या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गणेशगांवच्या प्रतीक्षा ठोंबरेची वैद्यकीय क्षेत्रात गरुडझेप यश

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** गणेशगाव (ता.माळशिरस) येथील ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच सौ. उषा रामचंद्र ठोंबरे यांची कन्या डॉ.प्रतीक्षा उषा रामचंद्र ठोंबरे यांनी रशियामध्ये सहा वर्ष राहून एमबीबीएस ही वैद्यकीय क्षेत्रातील उच्च डिग्री संपादन करून आपला व गावाचा जिल्हात नावलैकीक मिळवला आहे.

सन २०१८-१९ पासून २०२३-२४ पर्यंत एमबीबीएसचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले व भारतात वैद्यकीय क्षेत्रात कार्य करण्यासाठी आवश्यक असणारी भारतीय वैद्यकीय बोडार्ने निर्धारित केलेली परीक्षा म्हणजेच एफएमजीई ही परीक्षा पहिल्या प्रयत्नात पुर्ण केले आहे. दिवसातील १५ ते १६ तास अभ्यास करीत उत्कृष्ठ गुण



मिळवून भारतात डॉक्टर म्हणून कार्य करण्यासाठी योग्यतेचे प्रमाणपत्र पहिल्या प्रयत्नांच्या जोरावर मिळविले आहे.माळशिरस तालुक्यातील गणेशगांव हे दिड हजार लोकसंख्येचे गाव असून येथील नागरिकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय आहे.एका शेतकरी आई वडिलांचा चेहरा व त्यांचे कष्ट डोळयासमोर ठेवून अथक प्रयत्न करून जिद्द आणि चिकाटीने यश खेचून आणले व तीने आई वडिलांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न सत्यात उतरविले आहे.लेकीने गगन भरारी घेण्यासाठी तिच्या पंखांना बळ देण्याचे काम आई वडिलांना केले आहे.लेकीचे हे यश पाहून त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.

कोरोना काळात बिकट प्रसंग ओढवला असतानाही आई वडिलांची खंबीर साथ दिली व तिच्या स्वप्न पूतीर्साठी ती प्रेरक ठरली.प्रतिक्षाचा हा यशस्वी प्रवास ग्रामीण भागातील तरुण तरुणींना प्रेरणा देत आहे.सध्या पंचक्रोशीत सर्वत्र तिच्या या यशाचा बोलबाला आहे. तिच्यावर अभिनंदनाचा व कौतुकाचा वर्षाव होत आहे. वैद्यकीय सेवा क्षेत्रात कार्य करण्यासाठी प्रतीक्षा आता सज्ज झाली आहे.

# नेताजी इंग्लिश मिडीयम स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस इंग्लिश मिडीयम स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष मनोहर माटेटी, माता पालक संघाच्या सदस्या उमा केचगुंडी आदी उपस्थित होते. प्रथम प्रमुख अतिथींच्या हस्ते श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या प्रतिमेचे पूजन, दीप प्रज्वलन, रंगमंच पूजन फित कापून स्नेहसंमेलनाचे उदघाटन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार यांनी अहवाल वाचन केले.संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार म्हणाले , पालकांच्या सहकार्याने शाळेची प्रगती होत आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षक व पालकांचे उत्तम संवाद महत्वाची असल्याचे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वागत गीत, गणपती गीत,शिवाजी महाराज , लावणी, तेलुगू रिमिक्स, गुलाबी साडी, सोशल मीडिया नाटक, मैत्री, बाबाना वंदन नाटक, गोंधळ गीत, देशभक्तीपर गीत, चित्रपटातील विविध गाण्यांवर सुंदर नृत्य सादर केले. या स्नेहसंमेलनात नर्सरी ते आठवी पर्यंतच्या २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजेस्विनी जोगीपेठकर यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे निवेदन प्रियांका खिलारे व संगीता कुडक्याल यांनी केले तर गायत्री परकीपंडला यांनी आभार मानले. स्नेहसंमेलन यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर वृंदानी परिश्रम घेतले.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयाची राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र व सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीस भेट

**वडाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा च्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची दिनांक २७ जानेवारी रोजी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर व कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर येथे अभ्यासपूर्ण भेट पार पडली.

या भेटीदरम्यान राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे प्रमुख संशोधक मा. श्री .डॉ. सोमनाथ पोखरे यांनी विद्यार्थ्यांना डाळिंब लागवडीबद्दल विस्तृत माहिती दिली. कृषी पदवीनंतर करिअरच्या संधीबद्दल ही विशेष मार्गदर्शन केले. डाळिंब लागवड करत असताना पाण्याचे , तणाचे ,रोगाचे आणि खत व औषधांचे नियोजन कशाप्रकारे केले पाहिजे याविषयी सांगितले. संशोधन केंद्रामध्ये लागवडीखाली असलेल्या डाळिंब



जातींच्या सोलापुरी लाल,भगवा या वाणाविषयी त्यांनी सखोल व तांत्रिक माहिती दिली. यानंतर राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राच्या वरिष्ठ संशोधन वैज्ञानिक डॉ. नम्रता. ए .गिरी यांनी विद्यार्थ्यांना डाळिंब फळ प्रक्रियेनंतर तयार होणाऱ्या विविध मूल्यवर्धित पदार्थांची ओळख करून दिली. यामध्ये प्रामुख्याने डाळिंब बीज तेल, डाळिंब रस, डाळिंब मुखवास, डाळिंब साल पावडर, डाळिंब वाईन इत्यादी पदार्थांच्या तयार करण्याच्या प्रक्रियेबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच यासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीची विषयी अधिक माहिती दिली.

यानंतर अभ्यास दौऱ्या मध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर येथे तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण पाहणी केली. यामध्ये विद्यार्थ्यांनी बाजार समितीमधील कृषी मालाच्या खरेदी-विक्री, साठवण तसेच या संबंधित इतर बाबींची माहिती घेतली. यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव मा. श्री. दत्तात्रय सूर्यवंशी यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये चालत असलेल्या दैनंदिन कामांविषयी माहिती दिली. शेतकऱ्याच्या मालाला योग्य तो हमीभाव देण्याचा प्रयत्न कशाप्रकारे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती करते याविषयी सांगितले. खाजगी अडत्यांमार्फत शेतकऱ्याची कोणत्याही प्रकारची फसवणूक अथवा पिळवणूक होणार नाही याची काळजी घेतली जाते, जर असे काही झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यास बाजार समिती नेहमी तत्पर असते असे प्रतिपादन केले. ई - नाम च्या माध्यमातून कशाप्रकारे शेतकरी आपला कृषीमाल देशातील कोणतेही कानाकोपऱ्यात विकू शकतात याविषयी मार्गदर्शन केले. बाजार समितीमधील शीत साठवण क्षमते विषयी त्यांनी माहिती सांगितली. या अभ्यास दौऱ्याच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्रा. शिवानंद मिश्रा,प्रा. धिरेन्द्र कुमार आणि प्रा. शुभांगी काळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मोहोळ शहरात प्रजासत्ताक दिन उत्साहात



**पोखरापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरासह तालुक्यात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात

साजरा करण्यात आला. तहसीलदार सचिन मुळीक यांनी शासकीय ध्वजारोहण केले. यावेळी स्वातंत्र्यसैनिकांच्यावारसांचा सन्मान करण्यात आला. तसेच शहरातील विविध शाळांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.यावेळी पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे, गटविकास अधिकारी विवेक जमदाडे, नायब तहसीलदार सुधाकर धाईजे, राजकुमार शहापुरे, सहाय्यक गटविकास अधिकारी विजयकुमार देशमुख आदींसह विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.पोलिसांबरोबर मोहोळ शहरातील राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला, नागनाथ विद्यालय, नेताजी प्रशाला, स्वामी विवेकानंद प्रशाला आदी शाळांतील विद्यार्थ्यांनी संचलन करीत सलामी दिली. सांस्कृतिक कार्यक्रमात चंद्रमौळी गणेश मंदिर जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थीनींनी लेझीमने सादर केलेले देशभक्तीपर गीताला उपस्थितांनी दाद दिली. राष्ट्रमाता इंदीरा कन्या प्रशाला, नागनाथ विद्यालय, देशभक्त संभाजीराव गरड इंग्लिश मीडियम स्कूल, श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूल,नेताजी प्रशाला, स्वामी विवेकानंद प्रशाला, जि. प उर्दू शाळा गुलशन नगर आदींसह शहरातील शाळांनी कार्यक्रमात

सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अशोक पाचकुडवे यांनी केले. नगरपंचायतीत मुख्याधिकारी योगेश डोके यांनी ध्वजारोहण केले.

# गुरुवारी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर आणि अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील नोकरी इच्छूक बेरोजगार उमेदवारांसाठी गुरूवार दिनांक 30 जानेवारी 2025 रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय (अल्पसंख्यांक विशेष) रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. सोलापूर जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या रोजगार मेळाव्यात 10 वी, 12 वी, आ.टी.आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीयन, मशीन ऑपरेटर, बी.कॉम, अशा प्रकारची एकुण 1 हजार 374 पेक्षा जास्त रिक्तपदे 13 उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी बायोडेटांच्या तीन प्रती आणि कागदपत्रासह गुरुवारी दिनांक 30 जानेवारी, 2025 रोजी ठीक सकाळी 10 ते दुपारी 2 वाजेपर्यंत ' अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, 68 आदर्श नगर, कुमठा नाका, सोलापूर ह्व येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या 0217-2992956 या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापूर येथे संपर्क साधावा. असे आवाहन श्रीमती संगीता खंदारे, सहायक आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांनी केले आहे.

# महिला कर्मचारीच पंप चालविणार राज्यातला एक आदर्श उपक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महिला कर्मचाऱ्यांमार्फत चालविण्यात येणारा पेट्रोल

पंप हा राज्यातला एक आदर्श उपक्रम आहे, असे गौरवोदगार पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी

काढले.प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सोलापूर महानगरपालिका व इंडियन

ऑईल कॉर्पोरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येणाऱ्या पेट्रोल पंपाचा शुभारंभ गोरे यांच्या हस्ते करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस आयुक्त एम. राज कुमार, मनपा आयुक्त शीतल तेली-उगले,पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप

जंगम, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, मुख्यलेखापालडॉ. रत्न राज जवळगेकर, नगर रचना विभागाचे उपसंचालक मनीष भिष्णूरकर, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीश पंडित, अनिता मगर, नगर अभियंता सारिकाअकुलवार, भाजपचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती

होती.प्रारंभी प्रास्ताविक भाषणात महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी या पेट्रोल पंपाची माहिती दिली. सर्व महिला कर्मचाऱ्यांकडून हा पेट्रोल पंप चालविण्यात येणार

आहे. यामुळे शहरवासीयांना चांगली सेवा मिळणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# जिजाऊंच्या स्मारकासाठी शिवप्रेमींचा ठराव



**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** दमाणी नगर भागातील ह.भ.प. आप्पा बुवा सवाळकर

उद्यानामध्ये राजमाता जिजाऊ यांचे स्मारक उभारण्यासाठी शिवप्रेमींनी एकमुखी ठराव केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर या भागातील पाच ते सहा शिवप्रेमी मंडळांच्या नूतन पदाधिकारी निवडीसाठी प्रथमच सामूहिक बैठक घेण्यात आली. या बैठकीत उद्यानात हा ठराव करण्यात आला. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अरुण घुले हे होते.

प्रारंभी वामन वाघचवरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी पार पडल्या. सोलापूरचे ज्येष्ठ साहित्यिक, अरण्यऋषी मारुती नवीन चितमपल्ली आणि मराठी सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच सवाळकर उद्यानात राजमाता जिजाऊ यांचे स्मारक असे एकूण तीन ठराव हेमंत पिंगळे यांनी मांडले. पहिल्या दोन ठरावाला सर्वांच्यावतीने टाळ्यांच्या गजरात अनुमोदन देण्यात आले. तर राजमाता जिजाऊ यांच्या स्मारकाच्या ठरावाला सर्व शिवप्रेमींनी हात वर करून अनुमोदन दिले. सुनील खटके यांनीसुद्धा राजमाता जिजाऊ यांच्या स्मारकासाठी सर्वांनी एकत्र येऊन स्मारक पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याचा शब्द दिला. जिजाऊ यांच्या स्मारकासाठीचा ठराव महानगरपालिकेकडे देऊन त्याचा पाठपुरावा करण्याचेसुद्धा सवार्नुमते ठरले.दरम्यान, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती दरवर्षीप्रमाणे यंदाही जल्लोषात साजरी करण्यासाठी प्रभाग सहामधील दादर विभागातील शिवजन्मोत्सव मंडळांनी जोमाने तयारी सुरू केली आहे.

या पार्श्वभूमीवर गवळी वस्ती तालीम संघ, धर्मवीर शंभुराजे प्रतिष्ठान, राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान, जय बजरंग तरुण मंडळ, लोकसेवा बहुउदेशीय सामाजिक संस्था आदी मंडळाचे नूतन पदाधिकारी यावेळी निवडण्यात आले.

या पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महादेव गवळी, श्यामराव गांगर्डे, विजय घुले,लहू गायकवाड, चंद्रकांत पवार, बाळासाहेब घुले,शेखर कवठेकर, ईश्वर अहिरे, बाळासाहेब गवळी, बालाजी चराटे, विष्णू जगताप, बबलू जगताप यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर घुले यांनी केले.

# सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत मनाई आदेश लागू

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात (पोलीस आयुक्तालय हद्दी मध्ये) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दि 29 जानेवारी 00.01 वाजले पासुन ते 12 फेब्रुवारी 2025 रात्री 24.00 वाजे पर्यंत या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 37 (1) व 37 (3) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. पोलीस उपायुक्त, (शहर) डॉ. दिपाली काळे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

सोलापूर शहर (पोलीस आयुक्तालय हद्दी मध्ये) धार्मिक सण, उत्सव ,जयंती, पुण्यतिथी साजरे करणारे शहर आहे. शहरात छोट्या मोठ्या कारणावरुन संप आंदोलने, निदर्शने होत असतात. तसेच शहरात आगामी काळात महात्मा गांधी पुण्यतिथी, श्री गणेश जयंती, माघीवारी , संत रोहिदास जयंती, आदी सण आहेत,तसेच बीड सरपंच खून प्रकरणावरून राज्यात आंदोलने सुरू आहेत. शिवाय मराठा ओबीसी व धनगर आरक्षण आदी माध्यमातून कायदा व सुव्यस्थेला बाधा निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, तसेच 5 किंवा 5 पेक्षा अधिक लोकांना एकत्र येण्यास मनाई, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे.

हा आदेश सक्षम पोलीस प्राधिकरणाची पुर्वपरवानगी घेतलेल्या मिरवणूका ,मोर्चे, रॅली,आंदोलने निवेदने , धरणे सभा यांना वगळून तसेच अंत्ययात्रा व अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

## बार्शी नगरपरिषद, बार्शी

### स्थापत्य विभाग

जा.क्र./स्थापत्य/५९०

दिनांक : २८/०१/२०२५

### ई- निविदा सुचना क्र.२५ सन २०२४/२५

Main portal : https// mahatenders.gov.in

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गाचे नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन बार्शी नगरपरिषदेकडील खालील कामांकरिता ई - नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

### ई- निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १) | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांकः- २८/१/२५ वेळ दुपारी १६:०० पासुन<br>दिनांकः- १८/२/२५ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| २) | निविदा ऑनलाईन अपलोड करण्याचा कालावधी | दिनांकः- २८/१/२५ वेळ दुपारी १६:०० पासुन<br>दिनांकः- १८/२/२५ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| ३) | बयाणा रकमेची ऑनलाईन पे स्लीप आणि ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलोड करणसाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे स्लीप व्यक्तिशः स्वतःचे नावाची गोपनियता बाळगुन सिलबंद लखोटयात तांत्रिक लिफाफ्या सह सादर करणेचा दिनांक | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयामध्ये दिनांक १८/२/२५ रोजी दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| ४) | तांत्रिक व अर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक वेळ | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयात दिनांक २०/२/२५ रोजी दुपारी १६:०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील (शक्य झाल्यास) |

टिप :-

१. सर्व पात्र / इच्छुक निविदाधरकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी ई-निविदा प्रणालिच्या Main portal : http://mahatenders.gov.in व याच http:// mahatenders.gov.in साईटवर enrolled करणे अवश्यक आहे.

२. निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काहीशंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनीवर संपर्क साधावा. टोल फ्री नंबर ( १८००-२३३-७३१५)

३. निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्त ऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच बयाणा रक्कमेची ऑनलाईन पे स्लीप व ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलाड करणेसाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे स्लीप स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगुन ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांक वेळेपर्यंत सादर करणे अवश्यक आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडणेत येणार नाही. याची नोंद घ्यावी.

४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पाहवयास मिळतील सदर कामाची एक अथवा सर्व ई- निविदा कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

५. ई - निविदेमध्ये तांत्रिक लिफाफा क्र. १ मधिल अपलोड केलेल्या कागदपत्राची हार्ड कॉपीची प्रमाणित प्रत दि. १८/२/२५ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात जमा करणेची आहे.

बार्शी नगरपरिषद बार्शी

सही/-
मुख्याधिकारी
बार्शी नगरपरिषद, बार्शी